सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# पोक्सो प्रकरणातील आरोपीला 20 वर्षांची शिक्षा

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

**यवतमाळ :** अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी केळापूर येथील विशेष न्यायालयाने आरोपीला २० वर्षांच्या कठोर कारावासाची शिक्षा सुनावली. सुनील भिमा ऊर्फ भिमराव टेकाम (२४, रा. मुलकीपोंड, ता. झरी-जामणी) असे आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्याला पोक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत २० वर्षांची शिक्षा आणि सात हजार रुपये दंड ठोठावला आहे.

न्यायालयीन नोंदीनुसार, १० डिसेंबर २०२१ रोजी आरोपीने १५ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप होता. पीडितेने घडलेला प्रकार आईला सांगितल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर मुकुटबन पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली.

या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक अजित जाधव यांनी केला. आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानातील कलम ३६३, ३७६ व ५०६ तसेच पोक्सो कायद्यातील कलम ४ व १७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान वैद्यकीय अहवाल, साक्षीदारांचे जबाब आणि अन्य पुरावे संकलित करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा विशेष न्यायाधीश एम. ए. कोठारी यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. सरकारी पक्षाने नऊ साक्षीदार तपासले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता दिलीप निमकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबांचा विचार करून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले. पोक्सो कलम ४ अंतर्गत २० वर्षे कारावास व सात हजार रुपये दंड, कलम १७ अंतर्गत पाच वर्षे कारावास व सात हजार रुपये दंड, तर भादंवि कलम ५०६ अंतर्गत दोन वर्षे कारावास व तीन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावासाची शिक्षाही ठोठावण्यात आली.

न्यायालयीन कामकाजात सरकारी अभियोक्ता दिलीप निमकर यांना मुकुटबन पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक शोभा मडावी यांनी सहकार्य केले.

# टाकळी तलावात बुडून ३ विद्यार्थ्यांचा मृत्यू

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

**यवतमाळ :** यवतमाळ शहरालगतच्या टाकळी तलावात पोहण्यासाठी गेलेल्या जाजू महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. सोमवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास ही भीषण दुर्घटना घडली.

स्थानिक बचाव पथक आणि महसूल प्रशासनाने सायंकाळी ७.३० च्या सुमारास तिघांचेही मृतदेह तलावातून बाहेर काढले. अवघ्या तीन दिवसांत तालुक्यातील वेगवेगळ्या जलप्रकल्पांत बुडून पाच जणांचा बळी गेल्याने संपूर्ण यवतमाळ परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

पियुष विनोद यादव (१९, रा. पिंपळगाव), प्रथमेश सुनील यादव (१९, रा. बालाजी पार्क, पिंपळगाव) आणि प्रसाद नितीन सातपुते (१९, रा. बोरगावपुंजी, ता. आर्णी) अशी प्राणास मुकलेल्या विद्यार्थ्यांची नावे आहेत. तिघेही जाजू महाविद्यालयात 'बीएससी कॉम्प्युटर'च्या द्वितीय वर्षात शिकत होते. पियुष आणि प्रथमेश हे दोघे चुलत भाऊ होते, तर प्रसाद हा शिक्षणाच्या निमित्ताने यवतमाळात राहायला आला होता.

**कुटुंबियांचा काळीज पिळवटणारा आक्रोश :** घटनेची माहिती मिळताच ग्रामीण ठाणेदार प्रवीण मानव, स्थानिक तलाठी आणि महसूल पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बचाव पथकाने तात्काळ शोधमोहीम हाती घेत सायंकाळी साडेसातच्या सुमारास तिन्ही मृतदेह शोधाशोध करून बाहेर काढले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली; मुलांचे मृतदेह पाहून त्यांनी केलेला आक्रोश उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकणारा होता.



## फोटोशूटनंतर घडला थरार

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास तिघेही दुचाकीने टाकळी तलाव परिसरात गेले होते. तलावाच्या नयनरम्य काठावर फोटो आणि रील्स काढल्यानंतर तिघांनी पोहण्यासाठी पाण्यात प्रवेश केला. मात्र, पावसामुळे तुडुंब भरलेल्या तलावातील पाण्याच्या खोलीचा आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तिघेही एकापाठोपाठ एक पाण्यात ओढले गेले.

तलावाच्या काठावर बराच वेळ कपडे, चपला आणि कॉलेजच्या बॅगा बेवारस पडून असल्याचे टाकळीतील ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. संशय बळावल्याने ग्रामस्थांनी तात्काळ पोलिसांना पाचारण केले.

## पाण्यात बुडून पाच बळी

सध्या सर्वत्र जोरदार पाऊस सुरू असल्याने यवतमाळ परिसरातील नदी-नाले, तलाव आणि धबधबे ओव्हरफ्लो झाले आहेत. या निसर्गरम्य ठिकाणी तरुणाईची मोठी गर्दी जमते आहे. १४ ऑगस्ट रोजीच बोरगाव डॅमवर वाधवाणी फार्मसी कॉलेजच्या दोन विद्यार्थिनींचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेची शाई वाळते ना वाळते तोच टाकळी तलावात तीन तरुण विद्यार्थ्यांचा बळी गेल्याने चिंता व्यक्त होत आहे. धोकादायक पाणवठ्यांवर पर्यटकांनी व तरुणांनी जाणे टाळावे आणि सुरक्षिततेची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस व प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# विकासकामांवरून विरोधकांचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात

## उमरखेड नगर परिषदेत 'त्रिमूर्ती' कारभाराचा आरोप : आर्थिक व प्रशासकीय अधिकारांवरही प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १८ ऑगस्ट



**उमरखेड :** नगर परिषदेत जनशक्ती पॅनलच्या नेतृत्वाखालील सत्तेला आठ महिने पूर्ण होत असतानाच कारभारावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. नगर परिषदेतील पाच समित्यांच्या सभापतींना पुरेसे आर्थिक व प्रशासकीय अधिकार दिले जात नसल्याचा आरोप भाजपचे विरोधी पक्षगटनेते विजय हडपकर यांनी केला. दोन स्वीकृत नगरसेवक आणि नगराध्यक्षांच्या पतींच्या कथित हस्तक्षेपामुळे नगर परिषदेचा कारभार प्रभावित होत असल्याचा दावाही त्यांनी केला.

१६ ऑगस्ट रोजी स्थानिक विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत हडपकर यांनी नगर परिषद प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर टीका केली. यावेळी स्वीकृत नगरसेवक ॲड. विजय गुजरे, नगरसेवक गोपाल कलाने आणि नगरसेवक प्रतिनिधी सचिन घाडगे उपस्थित होते. आरोग्य, बांधकाम, पाणीपुरवठा, शिक्षण तसेच महिला व बालकल्याण समित्यांच्या सभापतींना त्यांच्या विभागाचा कारभार प्रभावीपणे चालविण्यासाठी आवश्यक अधिकारच दिले जात नसतील, तर विकासकामांना गती कशी मिळणार, असा सवाल हडपकर यांनी केला.

नगर परिषद शिक्षण विभागाने अतिरिक्त ९९ कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती केल्याने नगर परिषद निधीवर सुमारे ७० लाख रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडल्याचा दावा हडपकर यांनी केला. विद्यार्थीसंख्या कमी असलेल्या शाळांमध्येही शिक्षकांची नियुक्ती केली जात असल्याचा आरोप करताना काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अद्याप जमिनीवर बसून शिक्षण घ्यावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. मोडकळीस आलेल्या शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीपेक्षा सीसीटीव्ही आणि डिजिटल फलकांवर खर्च करण्याला प्राधान्य दिले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

शहरातील काही भागांत गढूळ पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप करत हडपकर यांनी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित केला. पाणीपुरवठा समितीच्या सभापतींच्या अनुपस्थितीत त्यांच्या पतींकडून कामकाज पाहिले जात असल्याचा दावाही त्यांनी केला. संबंधित कामकाजाचे सीसीटीव्ही चित्रीकरण आणि दूरध्वनी नोंद मागूनही माहिती दिली जात नसल्याचे त्यांनी सांगितले.

पावसाळ्यात नालेसफाई, कचरा व्यवस्थापन आणि रोगराई रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांकडे आरोग्य विभागाचे पुरेसे लक्ष नसल्याची टीकाही करण्यात आली.

विविध विभागांत अतिरिक्त कर्मचारी आणि कंत्राटी मनुष्यबळाची नियुक्ती केली जात असल्याचा आरोप करत नगर परिषद 'रोजगार देण्याचे दुकान' बनत आहे का, असा सवाल हडपकर यांनी उपस्थित केला. नगर परिषद निधीवर अनावश्यक आर्थिक भार टाकला जात असल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्नही त्यांनी केला. आपण उपस्थित केलेले आरोप चुकीचे असल्यास सत्ताधाऱ्यांनी ते खोडून काढावेत आणि आरोप सिद्ध न झाल्यास आपल्यावर कारवाई करावी, असे खुले आव्हानही हडपकर यांनी दिले. आपल्या प्रश्नांवर स्वीकृत नगरसेवकांकडून धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करून जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही कारवाई झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले. स्वीकृत नगरसेवक ॲड. विजय गुजरे यांनी शहरातील भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर प्रशासनाला धारेवर धरले. मागील तीन महिन्यांपासून भटक्या कुत्र्यांना पकडून निर्बीजीकरण केले जात असल्याचे सांगितले जात असले तरी ही मोहीम प्रत्यक्षात कितपत प्रभावी आहे, याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला. पकडलेल्या कुत्र्यांची संख्या आणि शहरातील वाढती संख्या यांचा विचार करता निर्बीजीकरण मोहिमेच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. 'नगर परिषदेत प्रगती पळून गेली आणि विकास झोपला आहे,' अशी टीका हडपकर यांनी केली. त्यांच्या आरोपांवर सत्ताधारी गटाकडून काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# वृक्षारोपणाच्या नावाखाली लाखोंचा चुराडा?

## महागाव-गुंज मार्गावरील लागवडीवर नागरिकांचे प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

**महागाव :** महागाव ते गुंज या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याच्या दुतर्फा गेल्या चार-पाच वर्षांपासून दरवर्षी पावसाळ्यात वृक्षारोपण केले जात आहे. मात्र, लागवडीनंतर रोपांची पुरेशी देखभाल व संरक्षण होत नसल्याने ती नष्ट होत असून, त्याच ठिकाणी पुन्हा वृक्षारोपण केले जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. त्यामुळे वृक्षारोपणाच्या नावाखाली शासनाच्या निधीचा अपव्यय होत आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी जुलै-ऑगस्टमध्ये एकाच ठिकाणी नव्याने रोपे लावली जातात. मात्र, त्यांना नियमित पाणी देणे, संरक्षण करणे आणि देखभाल करणे याकडे दुर्लक्ष होत असल्याने अनेक रोपे वाळून जातात. काही रोपे जनावरांकडून नष्ट होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

यंदाही मागील पंधरवड्यात या मार्गाच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यात आली. रोपांच्या संरक्षणासाठी सुमारे सहा ते सात फूट उंचीचे पीव्हीसी पाईप बसविण्यात आले असून, त्यावर 'पीडब्ल्यूडी महागाव' असे नमूद करण्यात आले आहे. मात्र, लागवडीनंतर काही दिवसांतच बहुतांश पाईप गायब झाल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. त्यामुळे संरक्षणाअभावी अनेक रोपे वाकून किंवा मोडून पडत असून, काही रोपे जनावरांच्या तावडीत सापडत आहेत.

गेल्या पाच वर्षांपासून हा प्रकार सुरू असल्याचा दावा स्थानिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे वृक्षलागवड, संरक्षण साहित्य, देखभाल आणि प्रत्यक्ष कामावर झालेला खर्च याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरवर्षी वृक्षारोपण करूनही रोपांचे अस्तित्व कायम राहत नसेल, तर या योजनेच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून मागील काही वर्षांतील वृक्षलागवडीचा खर्च, लावलेल्या रोपांची संख्या, संरक्षण साहित्य आणि त्यांची सद्यस्थिती याची तपासणी करावी. चौकशीत अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, नागरिकांनी केलेल्या आरोपांबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. प्रत्यक्ष वृक्षलागवड किती झाली, त्यासाठी किती निधी खर्च झाला आणि रोपांच्या देखभालीची जबाबदारी कोणाकडे आहे, याबाबत विभागाकडून स्पष्टता झाल्यानंतरच या आरोपांची वस्तुस्थिती समोर येणार आहे.

# झरी-जामणी तालुका अमरावती विभागात तिसरा

## इंटरनेटच्या अडचणींवर मात; शंभर टक्के धान्यवाटप

प्रतिनिधी १८ ऑगस्ट



**झरी-जामणी :** दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील इंटरनेटच्या अडचणींवर मात करून लाभार्थ्यांना नियमितपणे धान्यवाटप करणाऱ्या रास्तभाव दुकानदारांचा स्वातंत्र्यदिनी गौरव करण्यात आला. तहसील कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात तहसीलदार अक्षय रासने यांच्या हस्ते संबंधित दुकानदारांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्यवाटप 'पीओएस' यंत्र आणि इंटरनेटच्या माध्यमातून केले जाते. मात्र, झरी-जामणी तालुक्यातील अनेक गावांमध्ये इंटरनेटची सुविधा अद्याप सुरळीत नसल्याने दुकानदारांसमोर मोठी अडचण निर्माण होते. लाभार्थ्यांना धान्यवाटपासाठी 'पीओएस' यंत्र घेऊन इंटरनेटची रेंज असलेल्या ठिकाणी जावे लागते. अनेक अडचणी असूनही दुकानदारांनी व्यवहार पूर्ण करून शंभर टक्के धान्यवाटपाचे उद्दिष्ट साध्य केले.

या कामगिरीमुळे झरी-जामणी तालुका अमरावती विभागात शंभर टक्के 'पीओएस' व्यवहाराच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. दुर्गम भागातील भौगोलिक आणि तांत्रिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर ही कामगिरी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

यावेळी जय सोना माता महिला बचत गट शिबला-मजरा, पांडुरंग पोयाम, जय दुर्गाम बचत गट पाचपोहर, के. जी. लोडा खातेरा, एकता महिला बचत गट कटली-बोरगाव, बोटोंनी, एकता महिला बचत गट पालगाव, महेश्वरी महिला बचत गट पवनार, एम. एल. राजुरकर पांढरकवडा, डी. आर. आंबटकर खडकी, ए. डी. मेश्राम रूईकोट, एल. बी. जिट्टावार येवती, व्ही. पी. बघेले पिंप्रडवाडी, पंचशील महिला बचत गट जुनोनी, एस. एस. राऊत पीवरडोल, एन. व्ही. भोयर कोडपाखिंडी, एस. एस. उर्वते चालबर्डी, बी. झेड. आत्राम अतिपरसोडी-मुधाटी, एम. एस. खडसे दाभा, एन. आर. लक्षट्टीवार संतपल्ली, एस. एल. टेकाम पार्डी, जे. डी. कासावार अतिरायपूर तसेच माथार्जुन येथील महिला बचत गट संचालिकांचा गौरव करण्यात आला. अन्नपुरवठा अधिकारी नम्रता पारतकर, कुमरे, अभिलाष आणि विनोद पेरकावार यांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याचे रास्तभाव दुकानदार पांडुरंग पोयाम यांनी सांगितले. दुर्गम भागात इंटरनेटची समस्या असतानाही लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे धान्य वेळेत मिळावे, यासाठी रास्तभाव दुकानदारांनी केलेल्या प्रयत्नांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# दारव्हा घरफोडीचा छडा; दोघे ताब्यात

प्रतिनिधी १८ ऑगस्ट




**दारव्हा :** दारव्हा शहरातील जलाराम नगर परिसरात बंद घराचे कुलूप तोडून चोरी केल्याच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला. या प्रकरणी दोन संशयित आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल असा एकूण ४८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिसऱ्या फरार साथीदाराचा शोध सुरू आहे.

अतुल राजू चांदेकर (३२, रा. आठवडी बाजार, यवतमाळ) आणि अविनाश अमन जोगळेकर (२६, रा. इंदिरानगर, यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहे. जलाराम नगर, आर्णी रोड, दारव्हा येथील बंद घराचे कुलूप-कोयंडा तोडून सोने आणि रोख रक्कम चोरीला गेल्याप्रकरणी दारव्हा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तपास करीत होते.

दरम्यान, १६ ऑगस्ट रोजी अवधूतवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना चोरीचा मुद्देमाल विक्रीसाठी दोन जण यवतमाळच्या आठवडी बाजारात येणार असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी दुर्गामाता मंदिराजवळ सापळा रचून अतुल राजू चांदेकर (३२, रा. आठवडी बाजार, यवतमाळ) आणि अविनाश अमन जोगळेकर (२६, रा. इंदिरानगर, यवतमाळ) यांना ताब्यात घेतले.

चौकशीत दोघांनी आणखी एका साथीदारासह दारव्हा येथील बंद घराचे कुलूप तोडून चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरीनंतर तिघांनी मूर्तिजापूर रेल्वे स्थानकावर चोरीच्या मुद्देमालाची विभागणी केली होती.

आरोपींकडून २.५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, ३.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे टॉप्स, १,७०० रुपये रोख आणि एअरटेल सीमकार्डसह रेडमी कंपनीचा मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शिवशंकर कायंदे आणि पथकाने केली. प्रकरणाचा पुढील तपास दारव्हा पोलिस करीत आहेत.

# वृद्धाश्रमात सत्यपाल महाराजांचे समाजप्रबोधन

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

**आर्णी :** अंजली ड्रेसेसच्या वतीने अरुणावती कॉलनीजवळील नवीन जागेत स्व. सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रमाचे स्थलांतर करण्यात आले आहे. यानिमित्त विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, बुधवार, १९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता सप्तखंजिरीवादक सत्यपाल महाराज यांच्या 'सत्यवाणी' समाजप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



आर्णी-दाभडी मार्गावरील अरुणावती कॉलनीजवळील नवीन ठिकाणी हा वृद्धाश्रम सुरू करण्यात आला आहे. अंजली ड्रेसेसचे संचालक संतोष श्रीवास व राजेश श्रीवास यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास आर्णी शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सत्यपाल महाराज सप्तखंजिरीच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांवर भाष्य करीत जनजागृती करणार आहेत. सामाजिक बांधिलकी, वृद्धांची सेवा, व्यसनमुक्ती आणि समाजातील विविध समस्यांबाबत ते उपस्थितांना प्रबोधन करणार आहेत.

# आदिवासी वसतिगृहांच्या नव्या नियमाने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार

## अंतर, उत्पन्न व उपस्थितीच्या अटींवर आ.भीमराव केराम यांचा आक्षेप; मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे पुनर्विचाराची मागणी

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

**झरी :** आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशासाठी लागू करण्यात आलेल्या सुधारित नियमावलीमुळे दुर्गम भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता व्यक्त करीत किनवट-माहूरचे आमदार भीमराव केराम यांनी या नियमांच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले असून विद्यार्थीहिताच्या दृष्टीने शासन निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी केली आहे.

आदिवासी विकास विभागाने ५ ऑगस्ट रोजी शासकीय आदिवासी वसतिगृहांसाठी सुधारित नियमावली जारी केली. या नियमांतील अंतराची मर्यादा, पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची अट आणि ७० टक्के उपस्थितीची सक्ती यामुळे विशेषतः दुर्गम, डोंगराळ आणि वनवासी भागातील विद्यार्थ्यांना अडचणी येऊ शकतात, असे केराम यांनी म्हटले आहे.



दुर्गम भागात वाहतूक आणि सार्वजनिक परिवहनाच्या सुविधा मर्यादित असल्याने केवळ अंतराचा निकष लावल्यास गरजू विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहावे लागू शकते. पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा २.५० लाख रुपये ठेवण्यात आली आहे. वाढती महागाई आणि शिक्षणाचा खर्च लक्षात घेता या अटीचाही पुनर्विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

वसतिगृहातील उपस्थिती ७० टक्क्यांपेक्षा कमी राहिल्यास, विशेषतः सलग तीन महिने अशी स्थिती राहिल्यास प्रवेश रद्द करण्याची तरतूद आहे. आजारपण, कौटुंबिक परिस्थिती, वाहतूक अडचणी यांसारख्या अपरिहार्य कारणांचा विचार करून या नियमात शिथिलता देण्याची मागणी केराम यांनी केली आहे. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमुळे दुर्गम भागातील इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्कच्या अडचणीही विद्यार्थ्यांसाठी अडथळा ठरू शकतात. त्यामुळे ऑफलाइन सहाय्य केंद्रे उपलब्ध करून देण्याची सूचना त्यांनी केली आहे.

## पूर्वीचे प्रवेश अबाधित ठेवण्याची मागणी

नवीन नियम लागू करण्यापूर्वी विद्यार्थी, पालक, लोकप्रतिनिधी, आदिवासी विद्यार्थी संघटना आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करावी. तोपर्यंत पूर्वीच्या नियमांनुसार पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश व नूतनीकरण सुरू ठेवावे, अशी मागणी आमदार केराम यांनी केली आहे. विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत, यासाठी विद्यार्थीहितैषी सुधारित शासन निर्णय किंवा शुद्धीपत्रक तातडीने काढावे, असेही त्यांनी म्हटले आहे.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**

**जाहिर नोटीस**

एम.आर.सी. ८१/321/२०२६
तहसिल कार्यालय, पुसद
दिनांक 10/08/2026

**आवेदक -** श्री.सौ./ शेख शफी शेख युसुफ रा. शेंबाळपिंपरी ता. पुसद जि. यवतमाळ
**अनावेदक-** मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद / सचिव, ग्राम पंचायत, शेंबाळपिंपरी ता. पुसद जि. यवतमाळ

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सो शेख शफी शेख युसुफ पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुलगा नामे श्री/सी/श्रीमती शेख मोसिन शेख शफी रा शेंबाळपिंपरी यांच्या जन्माची नोंद न्यायालयात जन्म / मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम १३ (३) प्रमाणे दिनांक 10/07/1983 रोजी त्यांच्या जन्म त्यांचे राहत्या घरी मौजा शेंबाळपिंपरी ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे. या बाबत यांच्या जन्माची नोंद मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद /सचिव, ग्रामपंचायत शेंबाळपिंपरी पंचायत समिती पुसद यांना घेण्याकरीता आदेश देण्यात यावा याकरीता दि. 26/05/2026 रोजी अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या करीता एम.आर.सी. ८१/ 321 /२०२६ तहसिल कार्यालय, पुसद च्या वतीने मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद / सचिव, ग्रामपंचायत शेंबाळपिंपरी यांना पत्र देण्यात येत आहे. ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार नामे, श्री. शेख शफी शेख युसुफ रा. शेंबाळपिंपरी स्वतः आई/मुलगा/ मुलगी / वडील / भाऊ/ बहिण/पूतण्या/आजोबा नामे श्री. सौ. शेख मोसिन शेख शफी रा शेंबाळपिंपरी ता. पुसद यांच्या जन्माची नोंदणी बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वतः हजर अगर आपले वकिला मार्फत हजर राहुन आपली हरकत अथवा आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाही असे गृहीत धरुन सदरहु अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल यांची नोंद घ्यावी. आज दिनांक 10/08/2026 रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली आहे.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पुसद**

सिटी न्यूज अकोला

३

मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# अकोल्यातील विधि संघर्षित बालकाचा अमरावतीत कारनामा

## बंद घरातून चोरला 72.27 लाखाचा ऐवज




प्रतिनिधी १८ ऑगस्ट

**अकोला :** शहरातून अमरावतीत आपल्या मावशीकडे आलेल्या एका सतरा वर्षीय बालकाने एका बंद घरात चोरी करून सोन्याचे दागिने व नगदी असा एकूण 72. 27 लाख रुपयांचा माल लंपास केला होता. या प्रकरणी अमरावती शहरातील नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील मौलाना आझाद कॉलनी येथील खळबळजनक घरफोडीचा गुन्हे शाखेने अवघ्या सहा दिवसांत यशस्वी उलगडा केला आहे. विशेष म्हणजे, अवघ्या १७वर्षाच्या विधीसंघर्षित बालकाने ही धाडसी चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, पोलिसांनी त्याच्याकडून संपूर्ण ४९८ ग्रॅम सोन्याचे दागिने व २ लाखांपैकी १.७० लाख रुपये रोकड असा एकुण ७२.२७ लाखांचा ऐवज जप्त केला. १७ ऑगस्ट रोजी 'टीम क्राईम'ने ही कारवाई केली.

मौलाना आझाद कॉलनीतील रहिवासी मोहम्मद मुजतबा अली हे ९ ऑगस्ट रोजी कुटुंबासह अचलपूर येथे गेले होते. हीच संधी साधत अकोला येथील रहिवासी व काही दिवसांपूर्वीच अमरावतीत मावशीकडे आलेला १७वर्षीय बालक त्यांच्या घरी शिरला. त्याने घराचा कडी-कोयंडा तोडून कपाटातील ४९८ ग्रॅम वजनाचे सुवर्णालंकार आणि २ लाख रुपये रोख लांबवले. विशेष म्हणजे, या चोरी गेलेल्या दागिन्यांपैकी काही सोने मोहम्मद मुजतबा यांनी दुबई येथून आणले होते. याप्रकरणी ११ ऑगस्ट रोजी गुन्हा नोंदविला गेला होता. या बालकाने चोरलेल्या २ लाखांपैकी ३० हजार रुपये खर्च केल्याची कबुली दिली

### मुलाच्या सॅकमध्ये मिळाला ऐवज अन्य घटनांत सहभाग ?

» पोलिसांनी जेव्हा त्याला ताब्यात घेतले त्यावेळी त्याच्याकडे चोरीचे संपूर्ण दागिणे व १.७० लाख रुपयांची रोकड असलेली सॅक होती. त्याच्याकडून अन्य काही गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता आहे. टीम क्राईमने २०० सीसीटीव्ही फुटेज तपासून ही कारवाई यशस्वी केली. पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखाप्रमुख अतुल वर यांच्या नेतृत्वात एपीआय महेश इंगोले व पीएसआय गजानन सोनुने यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# मातृशक्तीने केले 1008 पार्थिव शिवलिंग पूजन

## भक्तिमय वातावरणात पार पडला सोहळा



प्रतिनिधी १८ ऑगस्ट

अकोला : धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यात सदैव अग्रेसर असलेल्या श्री रामनवमी शोभायात्रा समिती व जानकी वल्लभौ मातृशक्ती सत्संग मंडळाच्या वतीने सहा वर्षांपासून श्रावण महिन्याचे औचित्य साधून १००८ पार्थिव शिवलिंग पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदाही श्रावण महिन्यातील पहिला सोमवार व नागपंचमीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून शेकडो मातृशक्तींच्या हस्ते १००८ पार्थिव शिवलिंगांचे पूजन करण्यात आले. गीतानगर परिसरातील राहत नगर पोलीस वसाहत येथील नर्मदेश्वर महादेव मंदिरात श्रावण सोमवारी सायंकाळी ४ वाजता प्रदोष मुहूर्तावर हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. श्रावण महिन्यात भगवान महादेवाच्या आराधनेला विशेष महत्त्व असल्याने परिसरातील महिला भगिनींसह शिवभक्तांनी मोठ्या संख्येने या सामूहिक पूजन सोहळ्यात सहभागी होत धार्मिक लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी तसेच सर्व शिवभक्तांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी अर्चना शर्मा, आरती शर्मा, रिया शर्मा, चंदा शर्मा, चंदा ठाकूर, पुष्पा वानखेडे, मनीषा भुसारी, अलका देशमुख, संगीता मांगटे, पुरी काकू, सारिका देशमुख, संगीता जानोरकर, प्रिया बासोडे, मुक्ता ढोले, मनीषा भागवतकार, राणी मावतवाल, रीता यादव, सुरभी इनामदार, अलका लोहकपुरे, पूजा लोहकपुरे, मीरा भवाने, रेखा भवाने, विद्या थोरात, नलिनी साबळे, विमल लोहकपुरे, मंगला सिद्ध मुखिया, प्रेमा मिश्रा, प्रियंका ठाकूर, पूजा ठाकूर, मीना मिश्रा आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. भारत व्यापार महोत्सवाच्या निमित्ताने कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या वतीने १२ ते १५ ऑगस्टदरम्यान आयोजित कार्यक्रमात नीती आयोगाच्या वतीने 'नारी वंदन' पुरस्कार सोहळा घेण्यात आला. या पुरस्काराच्या मानकरी ठरलेल्या अकोल्यातील काजल राजवैद्य यांना माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या गौरवाबद्दल १००८ पार्थिव शिवलिंग पूजन सोहळ्याच्या वेळी श्री रामनवमी शोभायात्रा समिती व जानकी वल्लभौ मातृशक्ती सत्संग मंडळाच्या वतीने काजल राजवैद्य यांचा सत्कार करण्यात आला. सौ. अर्चना कृष्णा शर्मा यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला.

# पंचनामा न झाल्याने दिव्यांग शेतकऱ्याचा जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न



प्रतिनिधी १८ ऑगस्ट

पातूर : तालुक्यातील बेलुरा येथील दिव्यांग शेतकरी अमोल सुभाष डाबेराव यांनी सोयाबीन पिकाचे नुकसान झाल्यानंतर पंचनामा न झाल्याने आज जिल्हाधिकारी कार्यालयात पेट्रोल घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली. डाबेराव यांनी आपल्या शेतात सोयाबीनची पेरणी केली होती. मात्र, सोयाबीनचे पीक उगवले नसल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले. या नुकसानीचा पंचनामा करून मदत मिळावी, यासाठी त्यांनी प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार केला. मात्र, त्यांच्या अर्जांवर अपेक्षित कार्यवाही न झाल्याचा आरोप त्यांनी केला.

वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न सुटत नसल्याने संतप्त झालेल्या डाबेराव यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. सोबत पेट्रोल घेऊन त्यांनी स्वतःला पेटवून घेण्याचा प्रयत्न केला.

उपस्थितांनी वेळीच हस्तक्षेप करून त्यांना रोखल्याने अनर्थ टळला. या घटनेमुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात काही काळ खळबळ उडाली. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्याच्या नुकसानीचा पंचनामा करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

# किड्स प्लॅनेट्स स्कूलमध्ये भारतीय सैन्याचा सन्मान; स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी १८ ऑगस्ट



**अकोट :** स्थानिक किड्स प्लॅनेट्स स्कूलमध्ये ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय सैन्यात कार्यरत असलेले विकास बोदडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, तर च्अजिंक्य भारतज् वृत्तपत्र समूहाचे पत्रकार योगेश लबडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, भारतीय स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान तसेच देशभक्तीचा संदेश देणारी प्रभावी भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून देशप्रेम आणि राष्ट्रसेवेची भावना प्रकर्षाने दिसून आली. कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले देशभक्तीपर समूह नृत्य. विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण आणि आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या नृत्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. यावेळी विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्याचे शौर्य, जवानांचे बलिदान आणि देशसेवेचे महत्त्व याविषयी आपले विचार व्यक्त केले. भारतीय सैन्यात कार्यरत असलेले अध्यक्ष विकास बोदडे यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना देशसेवेची प्रेरणा मिळाल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शिक्षिका मनिषा डीक्कर यांनी केले. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या रितू अढाऊ, स्कूल डायरेक्टर प्रा. मनीष अढाऊ, सायन्स हेड विशाल सरोदे, परीक्षा विभाग प्रमुख श्याम थारकर, क्रीडा शिक्षक मांडले तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

प्रतिनिधी १८ ऑगस्ट



**मूर्तिजापूर :** तालुका प्रतिनिधी : व्यंकटेश बालाजी इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या उपाध्यक्ष तथा प्राचार्या कुमुदताई दुबे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष प्रा. अवधूत ज्ञानेश्वर ढेरे, सचिव राजश्रीताई ढेरे, संचालिका रूपालीताई ढेरे, मुख्याध्यापिका सारिकाताई कडू व उपमुख्याध्यापिका मीनाक्षीताई महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करून त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमात क्रांतिकारक भगतसिंग व राजगुरू यांच्यावर ब्रिटिशांनी केलेल्या अत्याचारांवर प्रकाश टाकत त्यांच्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. तसेच तंबाखू, जर्दा, खर्रा, बिडी, सिगारेट, ई-सिगारेट व ई-हुक्का यांच्या दुष्परिणामांची जाणीव करून देत विद्यार्थ्यांनी या व्यसनांपासून आयुष्यभर दूर राहण्याची शपथ घेतली. सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक सुजित बनसोड यांनी केले.

# दिवंगत तुषार पुंडकर मित्र परिवाराने स्वातंत्र्यदिनी 200 रोपे लावली

प्रतिनिधी १८ ऑगस्ट



**अकोट:** स्वातंत्र्यदिनी दिवंगत तुषार पुंडकर मित्र परिवार आणि बांधकाम सभापती सुशील पुंडकर यांच्या सौजन्याने शहरात पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. शिवाजी कॉलेज ते शनवारा आणि सरस्वती शाळेसमोरील डी. पी. रोड या परिसरात तब्बल २०० विविध प्रकारच्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.केवळ झाडे न लावता त्यांच्या पूर्ण संगोपनाचा संकल्प देखील यावेळी सुशील पुंडकर व मित्र परिवाराने केला आहे. स्वखर्चाने बसवले 'ट्री गार्ड'लावण्यात आलेल्या सर्व झाडांचे जनावरांपासून आणि इतर कारणांमुळे नुकसान होऊ नये, म्हणून या मित्र परिवारातर्फे स्वखर्चाने मजबूत 'ट्रीगार्ड' लोखंडी जाळ्या बसविण्यात आल्या आहेत. येत्या पाच वर्षांत संपूर्ण अकोट शहर हिरवेगार व प्रदूषणमुक्त करण्याचा ठाम विश्वास बांधकाम सभापती सुशील पुंडकर यांनी यावेळी व्यक्त केला.

वृक्षारोपण कार्यक्रमाला अकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्ष माया धुळे, विवेक धुळे आणि मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांची प्रमुख उपस्थिती होती. "येणाऱ्या उन्हाळ्यात या लावलेल्या झाडांना पालिकेकडून पाणी पुरवण्यासाठी कुठेही कमी पडणार नाही," अशी ग्वाही मुख्याधिकारी व नगराध्यक्षांनी यावेळी उपस्थित नागरिकांना दिली. यामध्ये प्रहारचे जि.प्र. कुलदीप वसु, नंदकिशोर शेगोकार, डॉ गजानन महले, शुभम पाटील नारे, गणेश गावंडे, छोटू कराळे, सागर पुंडकर, अवि घायसुंदर, दत्ता पा.ओळंबे, रोहित पुंडकर, पवन बानेरकर, शेखर साबळे, रो.क्ल.अ. संदीप भुस्कट, यांच्यासह प्रभाग क्र.१७ मधील शेकडो नागरिक, व्यावसायिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना वसाहत येथे स्वातंत्र्य दिवस साजरा

## नागरिकांनी घेतली व्यसन मुक्तीची प्रतिज्ञा

प्रतिनिधी १८ ऑगस्ट



**अकोला :** शिवसेना वसाहत येथे 80 वा स्वातंत्र्य दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भारत मातेचे पूजन करण्यात येऊन ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्र गीतानंतर शेकडो नागरिकांनी व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारांनी प्रेरित होऊन प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय, मेडिकल विंगच्या माध्यमातून वैशाली दीदीच्या मार्गदर्शनात देण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आपला माणूस डॉ. अशोक ओळंबे पाटील शिवसेना अकोला जिल्हा समन्व्यक तर प्रमुख अतिथी वैशाली दीदी, आरती दीदी,गजानन गोलाईत, डॉ. संजय ढोरे, रवी पोलाखडे होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक गणेश पोलाखडे संचालन सागर पोलाखडे यांनी केले. ज्येष्ठ समाजसेवक गणेश पोलाखडे यांनी आयोजन केले होते. कार्यक्रमामध्ये सागर पोलाखडे, सागर खरोटे, रवींद्र पोलाखडे, विकास पोलाखडे, शिवांश मुरकर, सुरेश अग्रवाल, संतोष भटकर, ओम पोलाखडे, रामकृष्ण भटकर, अमोल पोलाखडे, रामकृष्ण उमक, सुनंदा राऊत, योगेश घाडगे, स्वराज मंडले, सचिन मंडले, युग पोलाखडे, मंगेश पटोकार, रामदास गमे, गणेश अनासने, मयूर सुलताने, शुभम गीते, धनराज भूलखळे, आशुतोष तिवारी, दत्ता बावस्कर, अनिकेत तांबट, मधुकर सोनारग, प्रणित रत्नपारखी, संदीप पोलाखडे, शोभा गाडगे, मीरा मुरकर, सीमा अग्रवाल, शालू मुंडे, सुनीता इंगळे, कौशल्या भाकरे, लक्ष्मी पवार, रेणुका राऊत, सुनंदा बोर्डे, रेणुका वानखडे यांचेसह शिवसेना वसाहत येथील नगरिकांची उपस्थिती होती.

# पोलिस हवालदार ओमप्रकाश जामनिक उकृष्ट सेवा पदकाने सन्मानित

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

अकोला : केंद्रीय गृहमंत्र्यालाया कडून जाहीर करण्यात आलेल्या पोलीस विभागात केलेल्या निष्कलंक, साहस व ध्येर्यपूर्ण सेवेसाठी ओमप्रकाश जामनिक यांना उकृष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले. पोलिस अधीक्षक



कार्यालयात आयोजित कार्यक्रमात पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, श्रीमती चांडक ( आयुक्त महानगर पालिका ), अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी यांच्याकडून पदक देऊन सन्मानित केले. ओमप्रकाश जामनिक यांनी यापूर्वी गोंदिया जिल्ह्यातील नक्षल भागात सेवा बजावली असून त्यांनी पोलीस विभागात केलेल्या धाडसी कर्तव्या मुळे राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक, विशेष व खडतर सेवा पदक , आंतरिक सुरक्षा पदक , पोलीस महासंचालक पदक अशा विविध पदकाकाने सन्मानित करण्यात आले आहे . सध्या ते पोलीस अधीक्षक कार्यालयातील नक्षल विरोधी शाखा / दहशतवाद विरोधी शाखा येथे कर्तव्य पार पाडीत आहेत. त्यांचे अभिनंदनाचा करण्यात येत आहे.

# शाळेची दुर्दशा पाहून माजी विद्यार्थ्यांनी केला कायापालट

## संकल्प पूर्ण करून समाजासमोर ठेवला आदर्श

प्रतिनिधी १८ ऑगस्ट



**अकोला** : काटेपूर्णा येथील संत गजानन महाराज महाराज विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी १९ लाख रुपये शाळेवर खर्च करून समाज ऋण फेडले. शाळेचा कायापालट तर झालाच विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध झाल्या. माजी विद्यार्थ्यांच्या अनुकरणीय कृतीची प्रशंसा होत आहे.

विद्यालयाची स्थापना १९६८ मध्ये झाली. परंतु संस्थेच्या वादविवादामुळे शाळेच्या विकासावर परिणाम झाला. मूलभूत सुविधा पासून विद्यार्थ्यांना ताटकळत राहावे लागले. शाळेची दयनीय अवस्था पाहून माजी विद्यार्थी बबन अभिमान सदाशिव तसेच अनंत देशमुख हे अस्वस्थ झाले. ज्या शाळेने आपल्या जीवनाला दिशा दिली, त्या शाळेची झालेली दुर्दशा पाहून माजी विद्यार्थी संघ स्थापन केला. माजी विद्यार्थ्यांना आवाहन केले. माजी विद्यार्थी आज विविध पदावर कार्यरत आहेत. बबन अभिमान सदांशिव हे अकोला पंचायत समिती येथे ग्राम विकास अधिकारी पदावर कार्यरत आहेत. तर अनंत देशमुख हे हैदराबादला खाजगी कंपनी मध्ये शास्त्रज्ञ आहेत. शाळेचा कायापालट करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी १९ लाख रुपये खर्च केले. शाळेवर नवीन टीन पत्रे टाकले, शाळेत इलेक्ट्रिक फिटिंगचे काम, नवीन पंखे, वृक्षारोपण व फळबाग लावली,शाळेमध्ये टाइल्सचे काम केले, बेंच दुरुस्ती, प्रवेशद्वार, आवार भिंत मुला-मुलींसाठी वेगवेगळे स्वच्छतागृह , पिण्याचे पाणी सुविधा, सीसीटीव्ही, शाळेची रंगरंगोटी यामुळे चेहरामोहरा बदलून टाकला.

या शाळेत परिसरातील सात आठ गावातील २६० विद्यार्थी शिक्षण घेत आहे. या कामाचे लोकार्पण स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून करण्यात आले. अकोला जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक सीमा जवरे उद्घाटक म्हणून कार्यक्रमाचे अध्यक्ष डिखोळे, तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार हरीश पिंपळे, माजी जिल्हा परिषद सदस्य छाया देशमुख, माजी विद्यार्थी संघाचे बबन सदांशिव व अनंत देशमुख, कृषी विभागाचे पंकज जगताप, उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक शेख अनिस, गिरधर भोंडे , श्याम शर्मा, अण्णा उमाळे, बाभूळगाव जहागीरचे माजी सरपंच आगाखान पठाण, अजय राऊत, सुरेश चव्हाण, शाळेचे मुख्याध्यापक सोळंके, विजय मालटे, दहीकर, अतुल घरडे, टाकसेन सदाशिव उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन उगले सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रफुल डिखोळे यांनी मानले.

प्रमुख पाहुणे म्हणाले, विद्यार्थ्यांचे हे कार्य समाजाला दिशा देणारे व प्रेरणादायी असून याचे अनुकरण प्रत्येक गावातील माजी विद्यार्थ्यांनी करावे, अशी भावना व्यक्त केली. ७ विद्यार्थ्यांचे हे कार्य समाजाला दिशा देणारे व प्रेरणादायी आहे असे म्हणाले.

# माजी उपसभापती इमरान खान यांच्या मध्यस्थीने रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला

प्रतिनिधी १८ ऑगस्ट



**आलेगाव** : माजी उपसभापती इमरान खान यांच्या मध्यस्थीने रस्त्याची समस्या सुटली. प्रतिभा ताई बोदडे ह्या ग्राम कार्ला येथील रहिवासी असून त्यांचे स्वतःचे घर आहे. परंतु प्रत्येक गावांमध्ये अतिक्रमण वाढले. एका महिलेने प्रतिभाताई बोदडे यांच्या घरात जाण्या येण्याच्या रस्त्यांमध्ये अतिक्रमण केले होते त्यामुळे त्यांना त्याचा त्रास व्हायचा. अतिक्रमण करून भिंतीचे बांधकाम केले. न्याय मिळत नसल्यामुळे त्यांनी नाईलाजास्तव दिनांक 14 रोज पासून ग्राम पंचायत कार्ला कार्यालया समोर आमरन उपोषण सुरू केले.सदर महिलेला न्याय मिळावा आणि अनुचित प्रकार घडू नये या अनुषंगाने पातूर पंचायत समितीचे माजी उपसभापती इमरान खान मुमताज खान यांनी प्रथम प्रतिभाताई यांच्या घरात जाण्या येण्याच्या रस्त्यात झालेल्या अतिक्रमण करून अडचण निर्माण करणाऱ्या महिलेला भेटून त्यांची समजूत काढून रस्ता मोकळा करून देण्याची विनंती केली.त्या नुसार महिलेने बांधकाम केलेल्या भिंतीला तोडून रस्ता मोकळा करण्याचे मान्य करून लिखित आश्वासन दिले. इमरान खान मुमताज खान आणि ग्राम कार्ला ग्राम पंचायत सरपंच यांनी प्रतिभाताई यांना ज्यूस पाजून उपोषण सोडविले. या वेळी देवनाथ तेलगोटे,भीमराव तेलगोट, इरफान खान,प्रवीण चव्हाण, मनसाराम बोदडे, बाळू चव्हाण, गजानन चव्हाण,अब्दुल जाकीर,अब्दुल गणी, सविता सोनोने,भीमराव सोनोने,जानोजी राठोड,आदींची उपस्थिती होती.

# गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सवाचा' दर्जा; राज्यभर जल्लोष!

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

मुंबई: महाराष्ट्राचा गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून अधिक व्यापक आणि भव्य स्वरूपात साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व मंत्रालयीन विभागांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे निर्देश राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी दिले आहेत. विभागांच्या अधिनस्त कार्यालये, आस्थापना आणि महामंडळांच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणपूरक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

गावापासून शहरापर्यंत गणेशोत्सवात नागरिकांचा व्यापक सहभाग वाढविण्यासोबतच महाराष्ट्राच्या समृद्ध गणेशोत्सव परंपरेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. गणेशोत्सवाला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळवून देण्याच्या दृष्टीनेही विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. ४८० उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना दीड कोटींची पारितोषिके राज्यातील ४८० उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर सुमारे दीड कोटी रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत. राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीतर्फे आयोजित केला जाणार आहे. तालुका आणि जिल्हास्तरीय द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांसाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत स्वतंत्र समारंभ आयोजित करण्यात येणार आहेत.

देश-विदेशात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम गणेशोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख देश-विदेशात पोहोचविण्यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांसह महाराष्ट्राबाहेरील १० राज्ये आणि भारताबाहेरील एका देशात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

नवी दिल्ली येथे पाच दिवस, तर मुंबईत आठ दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. स्थानिक संस्थांच्या सहकार्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सार्वजनिक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

ऑनलाइन दर्शनासाठी स्वतंत्र पोर्टल

प्रमुख गणेश मंदिरे आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे ऑनलाइन दर्शन उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात येणार आहे. तसेच घरगुती गणेशोत्सवाची छायाचित्रे अपलोड करण्यासाठी स्वतंत्र डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केला जाणार आहे. गणेशोत्सवाचा इतिहास, परंपरा, अष्टविनायक, पर्यावरणपूरक उत्सव आणि शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती प्रसारमाध्यमे तसेच समाजमाध्यमांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रसारित करण्यात येणार आहे. 'राज्य महोत्सव'चा लोगो शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केला जाणार आहे.



गणपतीविषयक रील्स स्पर्धा

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव यांच्या माध्यमातून गणपतीविषयक रील्स स्पर्धेचे आयोजन महसूल विभागीय आणि राज्यस्तरावर करण्यात येणार आहे. गणेशोत्सवाशी संबंधित परंपरा आणि प्रथा प्रभावीपणे मांडणाऱ्या मराठी चित्रपटाचाही गौरव करण्यात येणार आहे. यंदाच्या गणेशोत्सवात पर्यावरण संवर्धनाला विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. शाडूच्या मातीच्या गणेशमूर्ती, बीज गणपती, निर्माल्य संकलन व पुनर्वापर, प्लास्टिकमुक्त उत्सव, एलईडी सजावट आणि सौरऊर्जेवर आधारित मंडप याबाबत राज्यभर जनजागृती केली जाणार आहे. ग्रामपंचायत, महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या माध्यमातून स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण आणि कृत्रिम विसर्जन तलाव उभारण्याचे उपक्रम राबविले जाणार आहेत. जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी जलसंवर्धनाबाबतही नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या सहभागातून दुर्वा, फुले, नैवेद्य साहित्य आणि सेंद्रिय कृषी उत्पादनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविली जाणार आहे. महिला बचतगट आणि सहकारी संस्थांना मोदक, प्रसाद साहित्य तसेच स्थानिक उत्पादनांच्या विक्रीसाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. गणेशमूर्ती, मखर, सजावट आणि पूजासाहित्य तयार करणारे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग तसेच स्थानिक कारागिरांसाठीही प्रोत्साहनपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

युवक आणि विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

युवकांसाठी शाडूच्या मूर्ती, मखर, सजावट आणि डिजिटल डिझाइनवर आधारित उद्योजकता प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. शाळांमध्ये शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याच्या कार्यशाळांसोबत निबंध, वक्तृत्व आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. महाविद्यालयांमध्ये 'गणेश आणि विज्ञान' या विषयावर परिसंवाद, व्याख्याने आणि नवोपक्रम प्रदर्शनांचे आयोजन करण्यात येणार आहे. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण रोबोटिक्स देखावे तसेच पर्यावरणपूरक सजावटीबाबत जनजागृती करण्यावरही भर देण्यात येणार आहे.

आरोग्य, सुरक्षितता आणि सर्वसमावेशकतेला प्राधान्य

गणेशोत्सवाच्या काळात गर्दीच्या ठिकाणी मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे आणि सीपीआर प्रशिक्षण यांसारखे उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. भाविकांसाठी वैद्यकीय मदत केंद्रे, स्वयंसेवकांची नियुक्ती, अन्नसुरक्षा तपासणी आणि भेसळ प्रतिबंधक जनजागृती मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. दिव्यांग भाविकांनाही गणेशोत्सवाचा आनंद सुलभतेने घेता यावा यासाठी रॅम्प, व्हीलचेअर, सांकेतिक भाषेतील आरती, स्पर्शदर्शन आणि सुलभ प्रवेश व्यवस्था उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांवर महत्त्वाची जबाबदारी

उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी तालुका आणि जिल्हास्तरीय समित्या गठित करून प्रत्यक्ष भेटीद्वारे अर्जांची तपासणी, गुणांकन आणि अंतिम निकालाची कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. प्रमुख ठिकाणी विद्युत रोषणाई, विसर्जन मिरवणुकांचे संयोजन, स्थानिक कार्यक्रमांचे नियंत्रण आणि प्रसिद्धीची जबाबदारीही जिल्हाधिकारी कार्यालयांवर सोपविण्यात आली आहे. उत्सवाच्या सुरक्षिततेसाठी गृह विभागाने आवश्यक नियोजन करावे, तर सार्वजनिक बांधकाम विभागाने विसर्जन मार्ग, दिशादर्शक फलक, बॅरिकेडिंग आणि सुरक्षित पादचारी सुविधांची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

विविध विभागांसाठी नोडल जबाबदाऱ्या

विविध स्पर्धांच्या समन्वयाची जबाबदारी संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र राज्य कला अकादमी, मुंबई यांच्याकडे देण्यात आली आहे. मंत्रालयीन विभाग आणि कार्यालयांमार्फत आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांच्या समन्वयासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यक सूचना जारी करून 'राज्य महोत्सव गणेशोत्सव'मधील सर्व उपक्रम प्रभावीपणे आणि यशस्वीपणे राबवावेत, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी दिले आहेत.

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे निर्णय

## राज्य सरकारकडून दिव्यांग पेन्शन योजनेला हिरवा कंदील



प्रतिनिधी १८ ऑगस्ट

**मुंबई:** महिला व बाल कल्याण समितीच्या अंतर्गत येणाऱ्या विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात महिला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा श्रीमती मीनल संजय तुर्डे यांच्या दालनात शिवसेनेच्या महिला पदाधिकारी आणि महापालिका प्रशासनाची बैठक सोमवारी पार पडली.

या बैठकीत महिलांच्या सक्षमीकरणासह दिव्यांग व्यक्ती, महिला बचत गट आणि महिला उद्योजकतेसंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. श्रीमती मीनाताई कांबळी, माजी नगरसेविका श्रीमती शीतल म्हात्रे, श्रीमती संजना घाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. यावेळी महानगरपालिका उप-आयुक्त (शिक्षण) तथा संचालक (नियोजन) डॉ. प्राची जांभेकर, प्रमुख समाजविकास अधिकारी भास्कर जाधव, समाज विकास अधिकारी श्रीमती वेदिका पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. रेवती खांडेकर, श्रीमती विभा जाधव तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि समिती अध्यक्षा श्रीमती मीनल तुर्डे यांच्या प्रयत्नातून भांडूप येथे उभारण्यात येणाऱ्या महिला भवनाच्या कामाबाबत चर्चा झाली. महिला भवनाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानंतर इमारत व बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली. तसेच सन २०२५-२६ पासून बंद असलेली धर्मवीर आनंद दिघे दिव्यांग पेन्शन योजना पुन्हा सुरू करण्याचे आदेश बैठकीत देण्यात आले. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना पेन्शन देण्यात येणार आहे. गेल्या दीड वर्षापासून अनुदानापासून वंचित असलेल्या महिला बचत गटांसाठीही बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

महिला बचत गटांना देण्यात येणारे कमाल २५ हजार रुपयांचे खेळते भांडवल लवकरच पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. या संदर्भातील कार्यवाही अंतिम टप्प्यात असून प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर बचत गटांना खेळते भांडवल वितरित केले जाणार आहे. महिलांना रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विभागनिहाय व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्याचाही निर्णय घेण्यात आला. त्यासाठीची प्रक्रिया सुरू असून ती पूर्ण झाल्यानंतर महापालिका क्षेत्रातील महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिला भवन, दिव्यांग पेन्शन योजना, महिला बचत गटांना खेळते भांडवल आणि व्यवसायाभिमुख प्रशिक्षण या निर्णयांमुळे महिला व दिव्यांगांच्या आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणाला चालना मिळणार आहे.

# ठाण्याचा विकास आरसा छायाचित्र प्रदर्शनात दिसू द्या: एकनाथ शिंदे

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

ठाणे: छायाचित्र हे केवळ एका क्षणाचे चित्रण नसून त्यातून हजारो शब्द व्यक्त होतात. बदलत्या ठाणे शहराचा विकास आणि जुने-नवे रूप छायाचित्रांच्या माध्यमातून नागरिकांसमोर मांडावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

'जागतिक छायाचित्र दिनानिमित्त' ठाणे महानगरपालिका आणि ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या वतीने महापालिका भवनात आयोजित छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी छायाचित्रकारांच्या कार्याचे कौतुक केले. संकटाच्या प्रसंगी जीवाची पर्वा न करता घटनास्थळी पोहोचून महत्त्वाचे क्षण टिपणाऱ्या छायाचित्रकारांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. छायाचित्र हे केवळ एखाद्या क्षणाचे चित्रण नसून त्या एका छायाचित्रातून हजारो शब्द व्यक्त होत असतात. एखादे चित्र पाहिल्यानंतर त्या घटनेची किंवा प्रसंगाची अनुभूती नागरिकांना येते.



तसेच छायाचित्रांच्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा देखील दिला जातो. छायाचित्रकाराला त्याचा 'तिसरा डोळा' कायम उघडा ठेवावा लागतो, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. शहरातील वाढत्या सुविधा तसेच ठाण्याच्या विकासाचा प्रवास छायाचित्रांमधून मांडता येऊ शकतो, असे सांगून शिंदे यांनी पुढील वर्षी आयोजित करण्यात येणारे छायाचित्र प्रदर्शन 'ठाणे बदलतंय' या विषयावर आयोजित करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. ठाण्याचा कायापालट, रस्ते, उद्याने, वाहतूक आणि इतर नागरी सुविधांमधील बदल हे छायाचित्रांच्या माध्यमातून लोकांसमोर यावेत. त्यामुळे शहराच्या प्रगतीची कहाणी अधिक प्रभावीपणे मांडता येईल, असेही शिंदे म्हणाले. दरम्यान, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे महापालिका शाळांमधील ११ विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# पायधुनी पोलिसांची मोठी कारवाई

## राजस्थानातून आरोपी जेरबंद, कोट्यवधींची रोकड जप्त!



मुंबई: कार्यालयातून १ कोटी २० लाख रुपयांची रोकड आणण्याची जबाबदारी सोपवलेल्या कर्मचाऱ्याने, स्वतःकडे पैसे न ठेवता सुट्टे पैसे कसे चोरले, याचा खुलासा प्याधुनी पोलिसांनी केला आहे. या प्रकरणात, पोलिसांनी युवराज सिंग देवडा (२४) याला राजस्थानमधून अटक केली असून, त्याच्याकडून अपहरण केलेल्या रकमेपैकी १ कोटी १६ लाख ५० हजार रुपये जप्त केले आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी, पीरसिंग वसंत सिंग देवडा (३०), अद्याप फरार असून, त्याचा तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी, पीरसिंग देवडा यशव याच्या विश्वासाने रोझी फयार्यादीनवर दुसऱ्या कार्यालयातून १ कोटी २० लाख रुपये आणण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. दोन्ही बॅगांमध्ये ठेवलेली रोकड त्याला देण्यात येणार होती. पण, पीरसिंगाने पैशाची बॅग कागदांच्या बंडलांनी भरली आणि ती फयार्यादीकाकडे सोपवली. त्यानंतर तो रोकड घेऊन पसार झाला. १० ऑगस्ट रोजी घडलेल्या घटनेप्रकरणी, रोझी पायधुनी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१६ (४) अंतर्गत गुन्हा क्रमांक ८७२/२०२६ नोंदवण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, पायधुनी पोलिसांनी तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला.

# पोलिसांची मोठी कारवाई; चार मोटारसायकलींसह रिक्षा जप्त, चोर गजाआड

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

**ठाणे:** ठाणे शहर व भिवंडी परिसरातील वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईत ठाणे गुन्हे शाखेच्या घटक-२, भिवंडी पथकाला यश आले आहे. पोलिसांनी एका सराईत वाहनचोराला अटक करून त्याच्याकडून चार मोटारसायकली आणि एक ऑटो रिक्षा असा एकूण १ लाख ८७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईत वाहन चोरीचे पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. अक्षय पिराजी पवार (२२), रा. नुरानी मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, वडारवाडी, कारखाना रोड, हिंगोली, असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. गुन्हे शाखा घटक-२, भिवंडीच्या पथकातील पोलीस हवालदार साबीर शेख यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीकडे कौशल्यपूर्ण पद्धतीने चौकशी केली असता त्याने वाहन चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्याकडून चार मोटारसायकली आणि एक ऑटो रिक्षा हस्तगत करण्यात आली. या वाहनांशी संबंधित निजामपुरा, शांतीनगर, हिललाईन आणि मानपाडा पोलीस ठाण्यांतील वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १००/२०२६, शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७९/२०२६ व ५४६/२०२६, हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३७३/२०२६ आणि मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६४६/२०२६ असे गुन्हे नोंद आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. आरोपीने आणखी काही मोटारसायकलींची चोरी केली असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, त्या अनुषंगाने पुढील तपास गुन्हे शाखा घटक-२, भिवंडीकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस सह आयुक्त (गुन्हे) पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव आणि सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शोध-१, शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखा घटक-२, भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत, सहायक पोलीस निरीक्षक मिथुन भोईर, पोलीस उपनिरीक्षक रवींद्र बी. पाटील, रामचंद जाधव, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुनील साळुंखे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# मुंबई होणार रॅबीज मुक्त; भटके कुत्रे आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पालिकेचे नवे पाऊल

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

मुंबई: मुंबईतील भटक्या श्वान आणि मांजरींमुळे होणाऱ्या रेबीजच्या धोक्याला आळा घालण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'रेबीजमुक्त मुंबई' या उद्दिष्टासाठी मुंबई महानगरपालिका आणि 'वर्ल्डवाईड व्हेटरनरी सर्व्हिसेस-होप मिशन' रेबीज इंडिया यांच्यात महापालिका मुख्यालयात सामंजस्य करार (एमओयु ) करण्यात आला. या कराराअंतर्गत संबंधित संस्था मुंबईतील भटक्या कुत्र्यांचे रेबीजविरोधी लसीकरण पूर्णपणे नि:शुल्क करणार असून, शहरात रेबीज निर्मूलनासाठी व्यापक जनजागृती, सर्वेक्षण आणि प्रतिबंधात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. हा सामंजस्य



करार अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी उप-आयुक्त (विशेष) विनायक विसपुते, देवनार पशुवधगृहाचे महाव्यवस्थापक डॉ. कलीमपाशा पठाण, तसेच मिशन रेबीज इंडियाचे संचालक आणि (डब्ल्यूव्हीएस-होप मिशन) चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बालाजी चंद्रशेखर उपस्थित होते. महानगरपालिकेने २०२६ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी हा करार केला असून, या कालावधीत मुंबईत मोठ्या प्रमाणावर रेबीज प्रतिबंधक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

यावेळी बोलताना अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) प्राजक्ता वर्मा-लवंगारे यांनी सांगितले की, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि मत्स्यपालन, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २०३० पर्यंत श्वानांपासून होणाऱ्या रेबीजचे निर्मूलन करण्यासाठी राष्ट्रीय कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच, भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या मानक कार्यपद्धतीनुसार सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी भटक्या श्वानांचे लसीकरण करून रेबीज नियंत्रणासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. महापालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनाखालील हा उपक्रम, मुंबईतील भटक्या कुत्र्यांचे लसीकरण अधिक वेगाने करण्यास मदत करेल, तसेच नागरिकांमध्ये रेबीजविषयी जागरूकता निर्माण करून सार्वजनिक आरोग्य अधिक सुरक्षित करण्यासही साहाय्य करेल.

# पवई पोलिसांची कारवाई: आयआयटीच्या नावाने नामांकित कॉलेजमध्ये प्रवेशाच्या नावाने लूट

## देशभरातील पालकांची कोट्यवधींची फसवणूक, 10 आरोपींना अटक

प्रतिनिधी १८ ऑगस्ट

मुंबई: आयआयटी हैदराबादसह देशातील नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून पालक आणि विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या दोन बोगस कॉल सेंटरचा पवई पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. सोशल मीडिया आणि इन्स्टाग्रामच्या माध्यमातून देशभरातील पालकांशी संपर्क साधून त्यांच्याकडून प्रवेश शुल्क, डोनेशनच्या नावाखाली लाखो रुपये उकळणाऱ्या या टोळीतील १० आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही टोळी प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देतो असे सांगून पालकांना विश्वासात घेत होती. त्यानंतर वेगवेगळ्या टप्प्यांवर पैसे मागून



त्यांची आर्थिक फसवणूक करत होती. या कारवाईत पोलिसांनी मोबाईल, सिमकार्ड, लॅपटॉप, डेबिट कार्ड, दोन कार तसेच बँक खात्यातील रक्कम असा एकूण १ कोटी ३५ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पवई येथील ४७ वर्षीय महिलेच्या मुलाला आयआयटी हैदराबाद येथे प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून 'Tech Orbit Consultancy' (@techorbit1111) या इन्स्टाग्राम खात्याच्या माध्यमातून गौतम आणि सुमीत नावाच्या व्यक्तींनी त्यांच्याकडून १६ लाख ५० हजार रुपये घेतले होते. याप्रकरणी १७ जुलै २०२६ रोजी पवई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. फसवणुकीची माहिती मिळताच पोलिसांनी संबंधित बँकेशी संपर्क साधून रक्कम गोठविण्याची कार्यवाही केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135